# गजाननबुवा जोशी : जवळून

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - सत्यकथा, संपा. राम पटवर्धन, मौज प्रकाशन गृह, मुंबई, फेब्रुवारी १९७१)

आज उणीपुरी दोन तपे गुरूवर्य बुवांच्या सहवासात गेली. निदान नंतरची काही वर्षे तरी जाणत्या अवस्थेत. बुवांची धडपड पाहिली. त्यांचे यश पाहातोच आहे. मनात कशाचा ठसा अधिक खोलवर उमटला, असे पाहू लागल्यावर मात्र कठीण अवस्था होते. कारण, बुवांच्या बरोबर शिष्य म्हणून वावरलो, मुलासारखा राहिलो आणि सहकारी म्हणूनही काम केले. बुवांच्या बरोबर चौपाटीवर व्यायामाला गेलो-अगदी अर्धी चड्डी, कॅन्व्हसचे बूट या थाटात आणि मागे दबकत-दबकत तंबोऱ्यावरही बसलो. हे सारेच ठसे एका अर्थी खोल उमटले, कारण मीही कोवळा होतो. ठसे घेण्याचे मऊमनाचे वय होते. म्हणून मनात गर्दी झाली आहे. या गर्दीला विशेषणांची माळ पुरी पडणार नाही. पानावर पाने भरूनही अपुरेपणा वाटत राहील. तरीही बुवा कसे वर वर येताना दिसले, हे सांगण्याचा प्रयत्न करणार आहे.

जाण आली तेव्हापासून बुवा आमच्याकडे आहेतच असे मला आठवते. रेडिओच्या कार्यक्रमासाठी म्हणून प्रथम येत. गरम कोट, पायजमा, मफलर, एक मोठी निळसर ट्रंक, व्हॉयलीन, या थाटात येत. पुढे मुंबईत पंधरा दिवस आणि कोल्हापुरला पंधरा दिवस राहू लागले. शिकवण्या आणि कार्यक्रम चालू असत. घरी लोक शिकायला येत. मी कॉटवर बसून, लोळून वाचण्याचा प्रयत्न करी. यात स्वतःच्या शिकण्याच्या वेळा सोडून मी अभ्यास करावा असा उद्देश असे. अर्थात बुवांना हे कसे बघवणार! त्यांच्या आलाप-तानांची गुंतागुंत वाढत जाई. अनवधानाने दिला जाणारा ताल अवधान ठेवल्याशिवाय हातून सुटणार, असा प्रसंग येई आणि मग ताल राखणे हा इभ्रतीचा प्रश्न होई. पुस्तक ठेवून हाती डग्गा घेऊन बसणे, हे या लढाईचे पर्यवसान.

बुवा म्हणजे खरोखरच लढाई. ते सदा काहीतरी जिंकण्याच्या खटाटोपातच असत. 'सकाळी उठोनी' तब्येतीसाठी पहिला खटाटोप सुरू होई. त्रिफळा घेणेऽऽ हा पहिला वार. पळायला जाणे हा दुसरा वार. बुवांच्या एका पायास लहानपणी जखम झाली होती आणि म्हणून तो पाय जरा कमकुवत आहे. पण बुवांचा व्यायाम मग अक्षरशः एका पायावर होई. आणि परिणाम असा की, व्यायाम करून करून बुवांचा एक पाय अधिक पुष्ट झाला! अर्थात याचाही त्यांनी फायदा उठविला. ही ऑल्वेज पुट हिज बेस्ट फूट फॉरवर्ड! तब्येतीची लढाई ही बुवांच्या आयुष्यातली एक न संपलेली अवस्था आहे. बुवा अजून नमस्काराच्या भाषेत तब्येत मोजतात. औंधच्या राजेसाहेबांना बुवांइतका संतोष याबाबतीत कोणीच दिला नसेल.

यामुळे असो किंवा आईवेगळा मुलगा आणि विंचवाप्रमाणे पाठीवर बिऱ्हाड घेऊन हिंडणारा पिता यांमध्ये असणाऱ्या करकरीत नात्यामुळे असो, बुवांच्या बाबतीत लढाऊपणा हा वृत्तिविशेषच ठरला. त्यांच्या साधनेत, कलाविष्कारात, व्यवहारात जिंकण्याची-लढण्याची भाषा आणि कृती मुख्यतः दिसते, याचे कारण असे खोलवर रुजलेले आढळते. त्यांच्या कलासाधनेतली जिंकण्याची करामत सर्वांना माहीत आहे. हातात औंधच्या महाराजांनी व्हॉयलीन दिले, तेव्हा न समजणाऱ्या लिपीचे पुस्तक समोर ठेवल्यापेक्षा काही फारसा निराळा प्रकार नव्हता. डोक्यात खेळ, भोवती आणि गळ्यात गाणे आणि हातात हे नाठाळ वाद्य! वश होईपर्यंत ही पडदे नसलेली वाद्ये किती भयंकर असतात, याचा अनुभवच घेऊन पाहावा. भेसूर वाजतात, मनातला मऊसूत सूर नाहीसा

करू पाहातात आणि संगीताला समूळ नष्ट करण्याचा तर आपण उद्योग करीत नाही ना, अशी शंका मनात भरवतात. बुवांना या अवस्थेत कोणाचेच मार्गदर्शन नव्हते. तंत्राची परंपरा नव्हती, मंत्र सांगणारे आदर्श नव्हते आणि त्या वाद्याची गोडी लागेल, असा अनुभवही नव्हता. बुवांनी कोक्यातून वॉयलीन शोधून काढले. आणि यासाठी लढाई केली ती घनघोर!

गायनात तर बुवांनी दोन युद्धे खेळली आहेत. एक आपल्या आवाजाशी आणि दुसरे आपल्या घराण्याच्या अभिमानाशी. मर्मज्ञ संगीतसमीक्षक केशवराव भोळे यांनी त्यांच्याविषयी कुठेतरी म्हटले आहे की, बुवांनी खडक फोडून आवाज घडविला. ही गोष्ट अक्षरशः खरी आहे. पोटशूळ, मस्तकशूळ इत्यादी व्याधी जोरावर असता पोट, डोके फडक्याने बांधावे पण मेहनत करावी. मुले लहान असता मेहनतीच्या वेळी त्यांना खोली बंद (आणि मनाचे दरवाजे दुसऱ्या किती गोष्टींना बंद, देव जाणे!) असा प्रकार असे. वडिलांशी भांडून अनेकदा आणि मग स्वतंत्र मुलुखगिरीसाठी अखेर लवकर बाहेर पडलेले बुवा प्रसिद्धीला आले ते वॉयलीनवादक म्हणून. पण पहिल्यापासून प्रवाहाविरुद्ध जाण्याची हाडीमाशी खिळलेली सवय स्वस्थ कशी बसणार? गवय्याचा मुलगा गवई म्हणून गाजला पाहिजे, ही बुवांची ईर्षा! त्यामुळेही, खाँसाहेब मंडळींच्या भाषेत "हमारे जैसी" मेहनत सुरू झाली. या मेहनतीच्या तडाख्यात मग सर्व शुद्ध झाले आणि सगळे सापडले. व्यसनांनी भाजून निघालेली आवाजाची भूमी पुन्हा पिकती करायला बुवांनी जे केले त्याला आचार्य अत्रे पद्धतीने बोलावयाचे तर, "गेल्या हजार वर्षांत तोड नाही!" या झुंजीतून काय साधले याचे उत्तर बुवांच्या शब्दांत द्यायचे तर, "गवयांनी गवई मानले" हेच. आता आम जनतेला बुवांचे गाणे रूक्ष वाटते. कारण, हा नारिकेलपाक आहे. पण बुवांना मिळवायचे ते बुवांनी निश्चित मिळवले. इथे आठवण होते ती बुवांच्या वडिलांच्या - ती. गुरुवर्य बाबांच्या उद्गारांची. सालाबादप्रमाणे औंधला होणारा स्वामीमहाराजांचा उत्सव झाल्यानंतर जेवताना ती. बाबा म्हणाले होते, "गजानन, काल तू चांगला गायलास, आता समाधान झाले. तू कितीही चांगले फिडल वाजविलेस तरी गायला नसतास तर मला त्याची खंत लागली असती." गाण्याच्या प्रांतात उगीच आपला म्हणून बाप - मुलगा सुद्धा 'हां' म्हणत नसत, त्या काळातले आणि तशाच माणसाचे बोल आहेत हे! त्यांचे वजन पुरेपूर मानले पाहिजे.

संगीतातली दुसरी लढाई याहीपेक्षा गुंतागुंतीची, अवघड होती. आपल्या घराण्यापेक्षा दुसरे चांगले म्हणण्यात गवई जितका खळखळ करतो, तितकी चांगुणेने चिलयाचे कांडण करण्यातही केली नसेल. दोन्हीकडे तीच तीव्रता-वेदनेची, आदर्शाच्या प्राप्तीची आणि प्रिय प्रत्यक्षाच्या संपूर्ण त्यागाची. बुवांना आपल्या विद्येतला कमीपणा जाणवणे आणि त्याच्या भरपाईसाठी त्यांनी गुरू शोधणे यात अंतर कमीच जात असावे. वझेबुवा, भूर्जीखां, विलायतहुसेनखां सर्वांबद्दल सारखा आदर. भूर्जीखांच्याकडे बुवा शिकायला गेले तेव्हा पुण्याचा असलेला मांड मोडून, बँकेत पाचशे रुपये आणि मनावर चार मुलांच्या संसाराची जबाबदारी घेऊन गेले होते. पण दरवेळेस येऊन खांसाहेबांनी दिलेली नवीन चीज म्हणताना त्यांचा उत्साह पाहिला की वाटे, खांसाहेबांनी चिजेबरोबरच बुवांचा संसार नीट चालावा म्हणून एक दोन हिरव्या नोटाही पुढे सरकविल्या असाव्यात. बुवांनी शिष्यत्व स्वीकारण्यात अनमान केला नाही आणि 'शिष्यत्व स्वीकारले असे चारचौघांत कसे सांगू' असा विकृत लज्जाभावही मनात बाळगला नाही. जी गोष्ट घेण्यासारखी ती घेतली म्हणून सांगण्यासारखीही आहे, हे बुवांचे इमान म्हणजे एक कठोर व्रत आहे, हे मुद्दाम सांगायला हवे. बुवा भूर्जीखांकडे शिकायला लागण्याआधी त्याच घराण्याच्या दुसऱ्या अध्वर्यू सूरश्री केसरबाईंकडे "मला शिकवता का?" असे विचारायला गेले, ती वेळ मला अजून आठवते. अशा महत्त्वाच्या कामाला जायचे म्हणजे बुवा आमच्याकडच्या शिवाजीच्या आणि दत्तात्रयाच्या फोटोस नमस्कार करीत. पाय किंचितसे पसरून उभे राहून, आणि हाताची बोटे पूर्णपणे न जुळवता तोंडाने स्वामीमहाराजांचा नामोच्चार होई. पं. रविशंकर, उस्ताद विलायतखां यांच्याबरोबरच्या ऐतिहासिक जुगलबंद्या किंवा उस्ताद थिरकवांबरोबरचे असंख्य कार्यक्रम यावेळीसुद्धा बुवा जितके उत्तेजित झाले नव्हते, तेवढे या गुरुप्रसादाच्या मागणीसाठी जाताना झाले होते. बुवा कातर झाले असले तर ते तेव्हाच असावेत. आपल्या आणि दुसऱ्यांच्या संसारदुःखांचा बुवांच्या मनाला स्पर्श झालेला पाहिला नाही, आपला कार्यक्रम कसा होईल

याची त्यांना चिंता पडलेली पाहिली नाही, पण सूरश्री काय म्हणणार या आशंकेने ते बेधीर झालेले दिसले. आणि या गुरू करण्यात केवळ अनवट रागांची भावखाऊ नाणी गोळा करण्याची हाव नव्हती, तर ती गायकी आत्मसात करण्याची जिद्द होती. बुवा म्हणतात त्याप्रमाणे ते भरणेदार नसले तरी घराणेदार आहेत आणि ही घराणी बुवांनी प्राणपणाने जोपासली आहेत. इतकी काळजीने आणि जाणीवपूर्वक की, म्हटले तर एका घराण्याचे गाताना दुसऱ्याचा तुकडा येऊ देत नाहीत.

या लढाऊपणाचा एक आविष्कार म्हणजे बुवांचा फटकळपणा. बुवांना घालूनपाडून बोलता येत नाही, तसेच आडूनही बोलता येत नाही. "तुला गाणे येणार नाही. तू शंख आहेस!" हे बुवा इतक्या सहजतेने सांगतात की, "ही बस पुढे जाणार नाही. ही बंद पडली आहे" असे काहीतरी निरुपद्रवी विधान बुवा करीत असावेत, असे वाटते. यामुळे माणसे दुखावतात. पण बुवांच्या मनात ही गोष्ट येतच नाही. कारण, मन फक्त संगीतमार्गी आहे. (अर्थात तरीही बुवा पैशांचा व्यवहार चुकत नाहीत!) फटकळपणा असा की, शिष्याला धरणीने पोटात घेतले तर बरे, असे वाटावे. पण वर पुन्हा बुवा म्हणत, "अरे आता मी थंड झालो बराच, म्हणून नुसता बोलतो. पूर्वीचा असतो तर डग्गा डोक्यात घातला असता!" बिचारे शिष्य! शिकवणीला बुवा स्वतःच डग्गा का हाती घेतात, याची ही शिक्षाशास्त्रीय व्युत्पत्ती भलतीच प्रत्ययकारी वाटते!

हा फटकळपणाच जीवनाच्या इतर क्षेत्रांत मोकळेपणाचे रूप धारण करतो! बुवांच्या शिष्यांना शिकविण्याच्या वेळी-आणि एरवीही-कोणते रसाळ किस्से, मनमोकळे कबुलीजबाब, आणि नाजूक बाबतींतही सल्ले ऐकायला मिळतील, याचा नेम नसतो! शिष्यांनाच चोरट्यासारखे व्हावे! शिष्यिणींनी पदर तोंडाला लावून हसावे आणि बुवांना अधिकच जोर यावा, असे चालते. पुन्हा आणि बुवा स्पष्टीकरण करतात, "अरे त्यामुळे विषय चांगला समजतो!" कोणता विषय कोण जाणे!

या मोकळेपणाचीच आणखी एक बाजू म्हणजे श्रद्धाळूपणा. स्वामीमहाराजांचा अव्याहत होत असलेला उत्सव तर झालाच, शिवाय अनेक महाराज, दिसणारा प्रत्येक साधू, उजव्या कानाचे शंख विकणारी माणसे - सर्वांच्याच बाबतीत त्यांचा श्रद्धाळूपणा दिसतो. आणि मग वैद्य, ज्योतिषी यांच्यावरचा विश्वास आलाच. श्री. अप्पासाहेब पंत हे आफ्रिकेत प्रतिनिधी असता बुवांचा दौरा त्यांनी निश्चित केला होता. त्यासाठी नवे कपडे शिवणे इत्यादी सर्व तयारी झाली होती, पण ऐनवेळी स्वामीमहाराजांना कौल लावून, तो न मिळाल्याने सर्व दौरा रद्द केला. गवई लोकांत मला वाटते ही श्रद्धा अशा स्वरूपात सगळीकडेच दिसत असावी.

पण बुवा इथपर्यंत आले ते शेवटी या श्रद्धेच्या जोरावर नाही. त्यांची संगीत विद्येवरची श्रद्धा हाच त्यांचा स्थायिभाव, आधारस्वर. बुवा कितीही, कसेही दूर गेले तरी ते संगीताकडेच वळतात. आपले संगीत संभाळणे, याच एका प्रेरणेचे अस्तित्व त्यांच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सर्व व्यवहारांत जाणवते. बुवांची तारक शक्ती म्हणजे त्यांची ही श्रद्धा होय. बाकी कोणत्याही मानवी भावनेचा स्पर्श त्यांच्या मनाच्या अगदी खोलीवरच्या थरापर्यंत पोचला आहे की नाही, हे मला हमखास सांगता येईलसे वाटत नाही.

संगीतप्रेम मात्र खरे आणि बलवंत हे निश्चित. आणि हे असेच हवे नाही का! कलावंताचे खडतर अद्वैत आणखी कसे साकार व्हावे?

बुवांना लहानपणी 'राम' म्हणत. रामाच्या आयुष्याचे एकमेव मार्गदर्शक तत्त्व सत्य होते. बुवांच्या आयुष्याचे मार्गदर्शक तत्त्व संगीतविद्या आहे.